**GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI**

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

**Office of the Registrar**

**Dr.V.S. Irpate**
**Registrar**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** registrar.gondwanauniversity @ gmail.com

**पत्र क्र. No.GU/Reg/1413/2016** **Dt:15/03/2016**

प्रति,

मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :— भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमीत्त आयोजीत विद्यापीठस्तरीय एकदिवसीय परिसंवाद या कार्यक्रमामध्ये सहभाग घेण्याकरीता इच्छुकांना पाठविण्याबाबत....**

**महोदय / महोदया,**

आपणास कळविण्यात येते की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्सव रौप्य महोत्सवी जयंती वर्ष २०१५—१६ च्या निमीत्ताने गोंडवाना विद्यापीठाने महामानवाला अभिवादन करण्यासाठी महाविद्यालयाद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे असे यापुर्वीच परिपत्रक व स्मरण पत्राद्वारे कळविले आहे. या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करण्याचे आयोजन समितीने ठरविले आहे. यामध्ये परिसंवाद, सायकल रैली व पथनाटय, निबंध स्पर्धा, भीमगीत गायन स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमांचा समावेश आहे.

शनिवार दिनांक १९/०३/२०१६ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता मा. श्री. ई. झेड. खोब्रागडे माजी सनदी अधिकारी नागपूर, मा. श्री. ॲड. संदेश भालेकर आंबेडकरी विचारवंत नागपूर, समाजकार्यकर्ते मा. प्रा. डॉ. दिलीप बारसागडे व मा. श्री. रोहीदास राउत पत्रकार हितवाद, गडचिरोली या अभ्यासु व व्यासंगी तज्ञ मंडळीचे विद्यापीठस्तरीय एकदिवसीय परिसंवाद या कार्यक्रमात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्यातील विविध पैलुंवर मार्गदर्शन लाभणार आहे.

करीता सदरहु बाब आपल्या महाविद्यालयातील इच्छुक प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून द्यावे व परिसंवाद या कार्यक्रमामध्ये सहभाग घेण्याकरीता पाठवावे. सहभाग घेणा—या व्यक्तीला प्रमाणपत्र देण्यात येईल. परंतु प्रवासखर्च किंवा दैनंदीन भत्ता विद्यापीठातर्फे अनुज्ञेय असणार नाही. सहभागी व्यक्तींनी स्वत:चा खर्च स्वत: करावा असे अपेक्षीत आहे.

धन्यवाद !

(डॉ. विनायक एस. ईरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली